# जिल्हा परिषद रत्नागिरी
## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन
## समाज कल्याण विभाग.

| E mail-dswozpratnagiri@gmail.com | दुर.क्रमांक-०२३५२ -२२२३९१ |
|---|---|
| जा.क्र.रजिप/सकवि/दिव्यांग कक्ष/जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र/ 3369 /२०२१. | दिनांक-०३/११/२०२१. |


प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी.
जिल्हा रत्नागिरी.

विषय - **रत्नागिरी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र चालविण्याकरिता स्वयंसेवी संस्थांकडून अर्ज मागविणे बाबत.**

संदर्भ - १. मा.आयुक्त,दिव्यांग कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य पुणे यांजकडील पत्र क्र.दिकआ/प्र-४/जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र योजना/ अंमलबजावणी/२०२०-२१, दि.२९.०१.२०२१.

२. मा.जिल्हाधिकारी,रत्नागिरी तथा अध्यक्ष,जिल्हा दिव्यांग व्यवस्थापन संघ, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, रत्नागिरी यांनी दिनांक ०१/११/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या तोंडी सूचना.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविणेत येते की, मा.आयुक्त,दिव्यांग कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांनी कळविलेनुसार व मा.जिल्हाधिकारी, रत्नागिरी तथा अध्यक्ष,जिल्हा व्यवस्थापन संघ, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, रत्नागिरी यांनी दिनांक ०१/११/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या तोंडी सूचनेनुसार रत्नागिरी जिल्हयामध्ये दिव्यांगांसाठी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र सुरु करावयाचे आहे. करिता सदर केंद्र चालविण्यासाठी रेड क्रॉस सोसायटी, महाराष्ट्र शासनाच्या अधिनस्त वित्तिय महामंडळे किंवा स्वयंसेवी संस्था (एन.जी.ओ.) यांचेकडून अर्ज मागविणे आवश्यक आहे.

तरी सदर विषयाची प्रसिध्दी पुढील मराठी व इंग्रजी वर्तमान पत्रामध्ये मोफत करणेत यावी. हि विनंती.

मराठी वर्तमान पत्र - रत्नागिरी टाईम्स, लोकमत, लोकसत्ता.व इतर.
इंग्रजी वर्तमान पत्र - टाईम्स ऑफ इंडिया.

**सोबत :- प्रसिध्दी पत्रक.**

जिल्हा दिव्यांग व्यवस्थापन संघ
सदस्य सचिव तथा
जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी.

प्रत :- माहितीसाठी सविनय सादर.
१.मा.जिल्हाधिकारी, रत्नागिरी तथा अध्यक्ष जिल्हा दिव्यांग व्यवस्थापन संघ, रत्नागिरी.
२.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी.
३.मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी.



Scanned with CamScanner

# प्रसिध्दी पत्रक.

## रत्नागिरी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र चालविण्याकरिता स्वयंसेवी संस्थांना प्रस्ताव सादर करणेचे आवाहन.

रत्नागिरी जिल्हयातील दिव्यांगांचे पुनर्वसन करण्यासाठी दिव्यांग पुनर्वसन केंद्रांची स्थापना करण्यात येणार आहे. तरी सदर केंद्र चालविण्यासाठी इच्छुक संस्थांकडून अर्ज मागविणेत येत आहेत. दिव्यांग पुनर्वसन केंद्र चालविण्याबाबत सविस्तर अटी व शर्ती https://ratnagiri.gov.in/ जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी व https://zpratnagiri.gov.in/ जिल्हा परिषद रत्नागिरी. या वेबसाईटवर देण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे सदरचे अर्ज समाज कल्याण विभाग, दिव्यांग कक्ष, तळ मजला, जिल्हा परिषद रत्नागिरी येथे प्रत्यक्ष दिनांक **१८/११/२०२१** पर्यंत सादर करावेत असे आवाहन श्री. संतोष चिकणे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, यांजकडून करण्यात येत आहे.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद, रत्नागिरी

Scanned with CamScanner

# समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी

| अ.क्र. | नमुद अटी व शर्ती |
|---|---|
| 1 | संस्था नोंदणी प्रमाणपत्र,विश्वस्त नोंदणी प्रमाणपत्र व दिव्यांग पुनर्वसन क्षेत्रातील दिव्यांग आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त अनुज्ञाप्ती प्रमाणपत्र. |
| 2 | संस्थेची घटना व उद्दिष्टे बाबतची प्रत इत्यादी. |
| 3 | सदर संस्थेला राज्यात अशा प्रकारची केंद्रे चालविण्याचा आठ वर्षांचा अनुभव हवा.त्याबाबत आवश्यक ती कागदपत्रे सादर करावीत.(विशेषत: दिव्यांग पुनर्वसन क्षेत्रातील, जसे की दिव्यांग मुलांचे शारिरीक पुनर्वसन,कृत्रिम अवयव व सहायभूत साधनांचे वाटप, सर्व प्रकारच्या दिव्यांगांना सल्ला व मार्गदर्शन केल्याचा अनुभव त्याचबरोबर शासकीय व निमशासकीय योजनांचा दिव्यांगांना लाभ मिळवून दिल्याचा अनुभव) |
| 4 | सदर संस्थेला या पुर्वी राज्यात दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयव वाटप शिबिरे आयोजित करण्याचा किमान 8 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. |
| 5 | संस्थेची आर्थिक परिस्थिती सबळ असलेचा पुरावा.लेखापरिक्षण अहवाल .किमान 25 लाख वार्षिक.केंद्रीय अनुदान न मिळाल्यास स्वबळावर योजना राबविण्यासाठी. |
| 6 | पुनर्वसन क्षेत्रात कार्यकरण्यासाठी संस्थेकडे तज्ञ व्यक्तींचे मनुष्यबळ असलेबाबतची माहिती. |
| 7 | संस्थेकडील स्थावर-जंगम मालमत्तेची माहिती. |
| 8 | NGO दर्पण प्रमाणपत्र. |
| 9 | शासकीय अनुदान न मिळाल्यास संस्था स्वबळावर प्रकल्प राबवेल,अशा प्रकारचे रक्कम रुपये 100 च्या बंधपत्रावर हमी देणा-या संस्थेला प्रथम प्राधान्य दिले जाईल. |
| 10 | महाराष्ट्र राज्यात कार्यरत असणा-या स्वयंसेवी संस्थेला प्राधान्य देण्यात येईल. |

Scanned with CamScanner

*जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राकरिता अर्ज करण्यासाठी संस्थांना आवाहन*

१८-११-2021

रत्नागिरी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र चालविण्याकरिता स्वयंसेवी संस्थांनी........ पर्यंत आपले अर्ज. समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी कार्यालयात सादर करावे.

*पात्रता निकष*

1 संस्था दिव्यांग आयुक्त कार्यालय पुणे त्यांचेकडून दिव्यांग पुनर्वसन क्षेत्रातील अनुज्ञाप्ती प्राप्त असावी.

2 संस्थेला सामाजिक क्षेत्रातील कार्याचा किमान दहा वर्षांचा व दिव्यांग पुनर्वसन क्षेत्रातील किमान आठ वर्षांचा अनुभव असावा.

3 संस्थेकडे विशेषतः DDRC उदिष्टे प्राप्तीसाठी खालील अनुभव असावा.

3 -1 दिव्यांग सर्वेक्षण, नोंदणी, अपंगत्व प्रमाणपत्र काढणे, विविध सवलत प्रमाणपत्रे काढणे, उदा : बस रेल्वे पास, वाहन परवाना इत्यादी काढणे चा अनुभव असावा.

3-2 अपंगत्व बद्दल जाणीव जागृती करणे, अपंगत्व प्रतिबंध आवर काम करणे, शीघ्र निदान व शीघ्र हस्तक्षेप करणे, याबाबत माहिती संकलित करणे तसेच दिव्यांगांच्या सक्षमीकरणाचा अनुभव विविध क्षेत्रातील असावा.

3-3 नॅशनल ट्रस्ट च्या योजना राबविण्याचा अनुभव असावा उदाहरणार्थ निरामया आरोग्य विमा, कायदेशीर पालकत्व इत्यादी.

3-4 दिव्यांगांना अपंगत्व नुसार लागणारे सहाय्यभूत साधने, उपकरणे, कृत्रिम अवयव याबाबत दिव्यांगांचे समुपदेशन करण्याचा उपरोक्त साधने दिव्यांगांना मिळवून देण्यासाठी, बसवण्यासाठी, सहाय्यभूत साधना सोबत जगण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी व कॅम्प आयोजित करण्याचा अनुभव असावा.

3-5 दिव्यांगांना आवश्यक असणाऱ्या फिजिओ थेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, स्पीच थेरपी सेंटर चालवण्यासाठी साधनसामुग्री व अनुभव असावा.

3-6 अपंगत्वाची तीव्रता कमी करण्यासाठी, शस्त्रक्रिया, संदर्भ सेवा, शस्त्रक्रिया साठी मदत करणाऱ्या चारिटेबल ट्रस्ट सोबत समन्वय साधण्याचा अनुभव असावा.

3-7 दिव्यांगाना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबनासाठी स्वयं रोजगार,नोकरी, विविध विभागाच्या शासकीय योजना,कर्ज योजना याबाबत सल्ला समुपदेशनाचा अनुभव असावा.

3-8 दिव्यांग सल्लामसलत केंद्र,हेल्पलाईन च्या माध्यमातून दिव्यांगांना तसेच त्यांच्या कुटुंबीयांना सेवा देण्याचा अनुभव व कार्यालयीन सेटअप असावा.

3-9 सुगम्य घर, परिसर व सुगम्य भारत अभियान यामध्ये सहभागाचा अनुभव असावा.

Scanned with CamScanner

3-10 अपंगत्वा बद्दल विविध प्रशिक्षणे समाजासाठी,शिक्षकांसाठी,समुदायासाठी आयोजनाचा अनुभव असावा.

3-11 शैक्षणिक व्यावसायिक कला कौशल्य दिव्यांगांमध्ये वृद्धिंगत करण्यासाठी च्या कार्यक्रमांच्या आयोजनाची दृष्टी व अनुभव असावा.

3-12 उपरोक्त कार्यक्रम रत्नागिरी जिल्हा पुनर्वसन केंद्रामार्फत राबविण्याचे असल्याने या जिल्ह्याच्या सामाजिक,आर्थिक, भौगोलिक,सांस्कृतिक बाबींची जाण असावा

3-13 उपरोक्त पुनर्वसन केंद्रासाठी आवश्यक असणारे किमान मनुष्य सध्याची स्थितीत संस्थेकडे असावे.

3-14 संस्थेकडे स्वतःची अथवा कराराने घेतलेली बॅरियर फ्री जागा रत्नागिरी जिल्ह्यात असावी.

3-15 संस्थेकडे स्वतःची चार चाकी वाहन असावे.

3-16 काही दिवस शासनाकडून अनुदान न मिळाल्यास उपरोक्त उपक्रम स्वतः चालवण्यासाठी संस्था सक्षम असावी.

Scanned with CamScanner